**भूमीसंपादन अधिनियम, २०१३ मधील कलम ३७ (३) नुसार अंतिम निवाडा जनतेकरिता संकेतस्थळावर प्रदर्शित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्र.शापक्र-२०२४/प्र.क्र.१४/भूसंपादन-४**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक**
**मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२**
**दिनांक- ३० जानेवारी, २०२६**

**प्रस्तावना:-**

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३, च्या कलम ३७ (३) मध्ये जिल्हाधिकारी, यांनी अंतिम स्वरुपात संपादन केलेल्या जमिनीच्या तपशीलासह प्रत्येक व्यक्तीस निवाडा, दिलेल्या नुकसान भरपाईची रक्कम तसेच जमिन संपादनाबाबत केलेल्या संपूर्ण कार्यवाहीचा सारांश, जनतेसाठी उघड करील आणि या प्रयोजनार्थ निर्माण केलेल्या संकेतस्थळावर प्रदर्शित करील, अशी स्पष्ट तरतुद आहे.

**०२.** तथापि, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम ३७ (३) नुसार असे अंतिम निवाडे जनतेच्या अवलोकनार्थ संकेतस्थळावर प्रदर्शित केले जात नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. याबाबत निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

उपरोक्त प्रस्तावनेमध्ये नमुद केल्यानुसार भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ खालील प्राप्त अधिकारात शासन असे दिशानिर्देश देते की, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (३) च्या अंमलबजावणी करीता, राज्यांत विविध प्रकल्पांसाठी संपादित झालेल्या तसेच सद्य:स्थितीत संपादन सुरू असलेल्या जमिनीच्या बाबतीत, भूसंपादनाचा अंतिम निवाडा जाहीर केल्यानंतर, नुकसान भरपाईच्या रक्कमेसह जमिनीच्या संपादनाच्या कार्यवाहीचा सारांश असलेली अंतिम निवाडयाची प्रत संबंधित भूसंपादन अधिकारी यांनी जनतेच्या अवलोकनार्थ जिल्हाधिकारी यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी. तसेच सदर संकेतस्थळावर प्रकल्प निहाय किंवा गावनिहाय अंतिम निवाडे पाहता येतील अथवा डाऊनलोड करून घेता येवू शकतील अशा पध्दतीने प्रसिध्द करण्याची दक्षता घेण्यात यावी.

**०२.** भुसंपादनाबाबत अंतिम निवाडा घोषित होवून, संबंधित जमिनीचा ताबा संबंधित भुसंपादन संस्थेस दिल्यानंतर अशा (अ) निवाडयाची प्रत आणि (ब) ताबा पावतीची प्रत, अशा जमिनीच्या अधिकार अभिलेखात नोंद घेण्याकरीता महसुली अधिकाऱ्यांना ७ दिवसांत पाठविण्याची जबाबदारी संबंधित भूसंपादन अधिकाऱ्याची राहील. तद्नंतर संबंधित भुसंपादन संस्थेचे प्रमुख याबाबत सातत्याने पाठपुरावा करून भुसंपादित जमिनीचे अधिकार अभिलेख अदयावत करून घेतील.

**०३.** जनतेच्या सुलभतेसाठी भूमीसंपादन अधिनियम, १८९४ नुसार व उक्त नमूद अन्य कायदयानुसार यापुर्वी संपादित केलेल्या जमिनीचे आणि आपल्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या सर्व भूसंपादनाचे अंतिम निवाडे देखिल स्कॅन करुन जनतेच्या अवलोकनार्थ संबंधित जिल्हाधिकारी यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**०४.** संबंधित जिल्हाधिकारी हे दर महा होणाऱ्या मासिक बैठकीमध्ये भूसंपादन अधिकारी यांनी सदर निर्देशांतील उक्त बाबींची अमंलबजावणी करण्यासाठी केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेतील.

**०५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०१३०१६२९१९६५१९ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,**

SHEETAL HARISH BHINGARDIVE

Digitally signed by SHEETAL HARISH BHINGARDIVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=811b70a9102967f853cc2b6ab33320a888d0446944cd32c5cbfea46ce603f707, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ABE1BF07925DA1BBAAACCA3C449FDCB0DFCA751E843E7D822224CFDBFE0D8669, cn=SHEETAL HARISH BHINGARDIVE
Date: 2026.01.30 16:30:44 +05'30'

**(शितल भिंगारदिवे)**
**सहायक संचालक, नगर रचना तथा**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, उपमुख्यमंत्री कार्यालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, उपमुख्यमंत्री कार्यालय, मुंबई.
५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८. मा. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. मा. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. मा.अपर मुख्य सचिव (वने, भूसंपादन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. मा.अपर मुख्य सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. मा.अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१३. मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
१४. मा. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
१५. सर्व विभागीय आयुक्त.
१६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
१७. सर्व जिल्हाधिकारी.
१८. प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/नागपूर.
१९. महाराष्ट्र विमानतळ विकास कॉर्पोरेशन लि., मुंबई.
२०. निवडनस्ती (भूसंपादन-४)